# नीति-बोध कथा

cpune.nic.in
cpune.nic.in
cpune.nic.in

प्रल्हाद अवचट

**राज्य साधन केंद्र, पुणे**
१२८/२, जे. पी. नाईक पथ, कोथरूड, पुणे ४११ ०२९

srcpune.nic.in

# नीति-बोध कथा

**श्रेणी** : I

**प्रथम आवृत्ती** : जानेवारी २००३

srcpune.nic.in

**संपादक** : डॉ. द. खं. पोखरापूरकर

**प्रकाशक** : राज्य साधन केंद्र, पुणे

© **राज्य साधन केंद्र, पुणे**

१२८/२, जे. पी. नाईक पथ,

कोथरूड, पुणे ४११ ०२९

**आतील चित्रे व मुखपृष्ठ** : चंद्रशेखर जोशी

srcpune.nic.in

**सजावट व मांडणी** : श्रीधर पाटील, नंदन खळे

**मुद्रक** : प्रिंट इंप्रेशन्स, हडपसर, पुणे ४११ ०१३

**किंमत** : रु. ९.००

# प्रस्तावना

srcpune.nic.in

नीति बोध कथा जनसामान्यास सतत शिक्षण देतात. 'मीपणाने घात केला, 'रामायण वाचले असते तर!' या कथा नवसाक्षरांचे मनोरंजन तर करतीलच पण त्याचबरोबर उचीत माहिती देतील.

srcpune.nic.in

राज्य साधन केंद्रास आपल्या वाचनासाठी हे पुस्तक सादर करताना आनंद होत आहे.

**डॉ. द. खं. पोखरापूरकर**
**संचालक**
राज्य साधन केंद्र, पुणे

srcpune.nic.in

# मीपणाने घात केला



srcpune.nic.in

एक मूर्तिकार होता. तो दगडातून सुंदर मूर्ती घडवित असे. लोक मूर्ती विकत घेत. तो माणसांचे पुतळेही करायचा. जिवंत वाटावेत असे. आपल्यासारखा मूर्तिकार कोणीच नसेल असा त्याला गर्व होता .

एकदा गावात एक ज्योतिषी आला. त्याने मूर्तिकाराला सांगितले, ‘‘मला तुझे मरण दिसते आहे. अगदी आजपासून महिन्यावर. तू आपला तयार रहा.’’

मूर्तीकार विचारात पडला. तेवढ्यात



srcpune.nic.in

त्याचा एक मित्र आला. तो म्हणाला, ‘‘तू तुझेच आठ पुतळे तयार कर. यमदूतांना खरा तू कोणता ते कळणारच नाही.’’

त्याला ते मनोमन पटले. आपले कसब पणाला लावून त्याने पुतळे तयार केले. हुबेहुब त्याच्या सारखेच.

तो दिवस आला. तो घराच्या अंगणात उभा राहिला. उजवीकडे व डावीकडे चार पुतळे, मधे तो. पाहणाऱ्याला नऊ पुतळे सारखेच वाटत होते.

यमदूत आले. तेही चकीत झाले.।तील खरा कोण? ते गोंधळले. दोघांनी काहीतरी विचार केला. ते एकमेकांशी बोलू लागले.

‘‘काय सुंदर पुतळे आहेत.’’ एकजण म्हणाला.

‘‘अगदी जिवंतच वाटतात’’ दुसरा बोलला.

srcpune.nic.in



यमदूत पुढे म्हणाले, ‘‘कोण असेल हा मूर्तीकार?’’ आणि ते निघाले. तोच त्यांना शब्द ऐकू आले, ‘‘अहो! मीच तो मूर्तीकार.’’

यमदूतांचे काम झाले. ते मनात म्हणाले, ‘‘माणसातला ‘मी’पणा जात नाही. तोच त्याचा घात करतो.’’

❑❑❑

# रामायण वाचले असते तर!



srcpune.nic.in

स्टेशनच्या फलाटावर एक म्हातारा माणूस रामायण वाचीत होता. गाडीला वेळ होता. हळूहळू गर्दी जमू लागली. त्यात एक तरुण जोडपे होते.

srcpune.nic.in

त्या तरुणाला म्हाताऱ्या माणसाची टवाळी करण्याची लहर आली. तो म्हणाला, ‘‘अहो आजोबा! रामायण काय वाचताय? चालू जमान्यात त्याचा काय उपयोग?’’

srcpune.nic.in

त्या माणसाने त्याच्याकडे दुर्लक्ष केले. तेवढ्यात गाडी आली. तो म्हातारा माणूस गाडीत चढला. दारामागे उभा राहिला.

तो तरुणही चढला. गाडी चालू झाली. तशी तरुणाने आरडाओरडा सुरू केला. कोणीतरी साखळी ओढली. गाडी थांबली.

srcpune.nic.in

तरुणाने खाली राहिलेल्या आपल्या बायकोला गाडीत घेतले. गाडी पुन्हा चालू झाली. म्हाताऱ्या माणसाने विचारले, ‘‘काय हो! गाडी का थांबली? काय झाले?’’



तरुणाने आपली बायको खाली राहिली होती हे सांगितले. तो म्हातारा माणूस खो खो हसू लागला. तरुणाने रागातच विचारले, “त्यात हसण्यासारखे काय आहे?”

म्हातारा माणूस म्हणाला, “हसू नको तर काय करू? तुम्ही रामायण वाचले नाही. आणि ऐकले पण नाही.”

srcpune.nic.in



srcpune.nic.in
srcpune.nic.in
srcpune.nic.in

तो तरुण आणखीनच भडकला. म्हणाला, ‘‘रामायणाचा इथे काय संबंध?’’

‘‘अहो रामायण वाचले असते तर असे झाले नसते.’’ म्हातारा म्हणाला.

‘‘अरे, राम वनवासात जात होते. त्यांना गंगा पार करायची होती. नावाड्याने नाव समोर आणली. तो रामाला म्हणला, ‘‘आपण चलावं महाराज.’’

श्रीरामांनी आधी सीतामाईला नावेत चढवले. नंतर ते चढले. मागून लक्ष्मण चढला. बायकोची काळजी आधी घ्यायची असते. हे रामायण वाचले असते तर कळले असते.’’ म्हाताऱ्याने समजावले.

आता तो तरुण खजील झाला.

❑❑❑

srcpune.nic.in srcpune.nic.in srcpune.nic.in